**प्रसिध्दीपत्रक**

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,
पुणे-४११००६

जा.क्र./ पोउपआ /वाह /नियो/ ५०६८ /२०२४ पुणे दिनांक - ०४/१०/२०२४

पुणे शहरातील लोणीकंद वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीत होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका,इ.) खेरीज करून खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. " सदर ठिकाणी यापुर्वी असलेले निर्बंध रद्द समजण्यात येतील "

## लोणीकंद वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,

➢ पुणे शहरातील खालील नमुद ठिकाणी / रस्त्यावर, तसेच या मुख्य रस्त्यांना जोडणा-या इतर अंतर्गत रस्त्यांवर नमुद वेळेत सर्व प्रकारच्या जड,अवजड,मंदगती (डंपर,आर.एम.सी. मिक्सर, जे.सी.बी. , रोड रोलर व इतर तत्सम वाहने) वाहनांची वाहतूक तसेच पार्किंग करणेस बंदी करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, पी.एम.पी.एम.एल. व खाजगी बसेस इ. खेरीज करुन)

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | जड वाहतूक बंदीचे रस्ते/ ठिकाण व जड वाहतूक बंदीची वेळ |
|---|---|---|
| १. | पुणे नगर रोड | वाघेश्र्वर चौक , वाघोली ते खराडी बायपास<br>(०७.०० ते ११.०० व १७.०० ते २१.००) |
| २. | केसनंद रोड | वाघोली ते शिवाजी चौक केसनंद गाव<br>(०७.०० ते ११.०० व १७.०० ते २१.००) |
| ३. | लोहगाव वाघोली रोड | लोहगाव चौक, वाघोली ते लोहगाव ते धानोरी मार्गे विश्रांतवाडी<br>(०७.०० ते ११.०० व १७.०० ते २१.००) |
| ४. | पुणे नगर रोड | वाघेश्र्वर चौक , वाघोली ते लोणीकंद<br>(०७.०० ते ११.०० व १७.०० ते २१.००) |
| ५. | लोहगाव रोड | लोहगाव पेट्रोलसाठा चौक ते विश्रांतवाडी (०७.०० ते २३.००) |

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर.

०४/१०

( अमोल झेंडे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- १. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २ पुणे शहर.**

२. **पोलीस निरिक्षक**, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे
२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३. **प्रभारी अधिकारी, लोणीकंद** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणे फलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल

इकडील कार्यालयास सादर करावा.

**४. पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

**५. पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

**६. मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे

२/-सदर ठिकाणी वरीलप्रमाणे फलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.